**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, मुक्काम पोस्ट पारगांव तर्फे अवसरी ब्रुद्रुक, तालुका - आंबेगांव, जिल्हा — पुणे, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात मंजूर असलेल्या मोलॅसिस/मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाचा विस्तार ४५.० किलोलिटर प्रतिदिन ते ९५.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा करणेबाबत पर्यावरणविषयक जाहिर ऑनलाईन जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, मुक्काम पोस्ट - पारगांव तर्फे अवसरी ब्रुद्रुक, तालुका -आंबेगांव, जिल्हा — पुणे, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात मंजूर असलेल्या मोलॅसिस/मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाचा विस्तार ४५.० किलोलिटर प्रतिदिन ते ९५.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा करणेबाबत पर्यावरणविषयक जाहिर ऑनलाईन जनसुनावणी दिनांक १५ जुलै, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे आयोजित करण्यात आलेली होती. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश नं. E-४८/२०२१, पत्र क्रं. बीओ/जेडी(ड्ब्लुपीसी/पीएच/बी-२१०६२९/एफटीएस-०२३७, दिनांक २९/०६/२०२१ व्दारे सदर जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी

खालीलप्रमाणे समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पुणे,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | **- अध्यक्ष,** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | **- सदस्य,** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | **- समन्वयक** |

श्री. नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, पुणे, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा आयोजक, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माननीय डॉ. जयश्री कटारे, अप्पर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व ऑनलाईन मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

समन्वयक यांनी असे सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, मुक्काम पोस्ट - पारगांव तर्फे अवसरी ब्रुद्रुक., तालुका - आंबेगांव, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या मंजूर असलेल्या मोलॅसिस/मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाचा विस्तार ४५.० किलोलिटर प्रतिदिन ते ९५.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला होता. जरी प्रकल्प प्रवर्तकांना ४५.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा आसवणी उभारणीसाठी दिनांक ३१-०३-२०२० रोजी पर्यावरणीय मंजूरी मिळालेली असली, तरी सदर प्रकल्प अद्यापपर्यत सुरु झालेला नाही. दरम्यानच्या काळात ऊस लागवडीचे प्रमाण वाढल्याने ऊसाच्या गाळपाची क्षमताही वाढविण्यात आली. त्यामुळे वाढीव मळीची उपलब्धता लक्षात घेऊन कारखाना व्यवस्थापनाने कार्यरत कारखान्यात ४५ केएलपीडी ते ९५ केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणीचा निर्णय घेतला.

सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५(जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे .

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, मंत्रालय, मुंबई यांना प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २४.१२.२०२० रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, म.प्र.नि. मंडळ, पुणे यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १० जून, २०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे जाहिर सूचनेत सर्व जनतेच्या माहिती साठी सूचना करण्यात आलेली होती की जरी सदरहू

जनसुनावणी ही प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली आहे, मात्र कोविड-१९ च्या पार्श्वभूमीमुळे ही जनसुनावणी झूम अप्लिकेशनव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल. त्यासाठी लिंकसुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सदर लिंक खालीलप्रमाणे :- https://us02web.zoom.us/j/87377274183?pwd=OHRiUnR3Q2pXQjRSYithdTJRWXZRZz09

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा सर्व दस्तावेज- पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू. सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-पुणे, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी- जिल्हा परिषद, पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, पुणे, तहसील कार्यालय-घोडेगांव, तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे, ग्रामपंचायत कार्यालय-पारगांव तर्फे अवसारी बु. तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे ,उप प्रादेशिक कार्यालय,पुणे-२ ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,पुणे ,पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते .

सदस्य, आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत जाहिर सूचना प्रकाशित दिनांक १० जुन, २०२१ रोजी करण्यात आली. जाहिर सूचनेतच सर्वांच्या माहितीसाठी टिप्पणी देण्यात आलेली होती की कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्रकल्प स्थानावर जनसुनावणी आयोजित करण्यात येईल. मात्र जनसुनावणी दिवशी कोविड-१९ मुळे जर लॉकडाऊन/व्यक्तींना एकत्र येण्याचे निर्बंध असतील, तर सदरहू जनसुनावणी ही ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात येईल. सद्यस्थितीचा विचार करुन जिल्हा प्रशासनाने ऑनलाईन जनसुनावणी घेण्यासच परवानगी दिल्याने ही जनसुनावणी ऑनलाईन घेण्यात येत आहे.

सदस्य, आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२ यांना काही सूचना व आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली .

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित आसवणी प्रकल्पास एकूण खर्च हा रुपये ८२९३ लाख येणार असून पर्यावरण व्यवस्थापनाचा भांडवली खर्च रुपये १३४८ लाख एवढा येणार आहे. त्यांनी प्रकल्पाची पर्यावरण व्यवस्थापन योजनेची संपूर्ण माहिती दिली.

सादरीकरणानंतर सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना सांगण्याअगोदर आपले नाव व गावाचे नाव सांगण्यात यावे अशी त्यांनी माहिती दिली.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक / पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री वैभव साहेबराव बढेकर, राहणार - जारकरवाडी, तालुका आंबेगाव, जिल्हा-पुणेः-**

| अनु.क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | मी जाधववाडीला राहतो. कारखान्यापासून ५.० कि.मी. अंतरावर माझे गाव आहे. प्रकल्पातील हवा प्रदूषण कसे रोखता येईल? | हवा प्रदूषणाचा मुख्य स्त्रोत हा बॉयलरला जोडलेल्या चिमणीतून असतो. त्यासाठी आपण ६० मीटर्सची चिमणी लावणार आहोत. त्यास आपण वेट स्क्रबर किंवा ईएसपी (इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपेटर) हे अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे ८०-८५% बाहेर येणारा धुर रोखला जातो. त्यामुळे आजूबाजूच्या हवेवर परिणाम होत नाही. |

**२) सौ. सुजाता रिठे, सरपंच, नागापूर, तालुका -आंबेगाव, जिल्हा-पुणेः-**

| अनु.क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | माझे गाव प्रकल्पापासून पाच कि.मी. अंतरावर आहे. प्रकल्पातील जल प्रदूषणाचा मुख्य स्त्रोत कोणता असणार आहे? | प्रकल्पात प्रदूषित पाणी निर्माण होते, त्यात स्पेंट वॉश, स्पेंट लिझ आणि कन्डेन्सेट हे मुख्य घटक असतात. त्यावर कारखान्यातच प्रक्रिया करणार असून कोणत्याही प्रकारे कारखान्यातून दुषित पाणी प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. दुषित पाण्यावर प्रक्रिया करुन ते कॉन्सन्ट्रेट (concentrate) करण्यात येईल त्यामुळे त्याचे प्रमाण (quantity) कमी करुन ते इन्सिनरेशन बॉयलरमध्ये इंधन म्हणून जाळण्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषित पाणी कारखान्याबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. |

**३) श्री नवनाथ राजाराम मेहेत्रे, राहणार-शिंगवे पारगांव, तालुका -आंबेगाव, जिल्हा-पुणेः-**

| अनु.क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | मी कारखान्याच्या साडेतीन ते चार किलोमीटर अंतरावर राहतो. नविन आसवणी प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना काही रोजगार मिळेल काय? | नविन आसवणी प्रकल्पात रोजगाराची संधी आहे. प्रकल्पात ९९ व्यक्तींची आवश्यकता आहे. त्यात स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात येईल. |

४) **सौ. सविता उबाळे, ग्रामपंचायत सदस्या, रांजणी, तालुका - आंबेगाव, जिल्हा-पुणेः-**

| अनु.क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | या आसवणी प्रकल्पातून कोणता घनकचरा बाहेर पडणार आहे? | प्रकल्पातून घन कचरा म्हणजे राख असते. ती बगॅस व स्पेंट वॉशची असते. ऊसाचे चिपाड असते, त्याचीही राख असते. त्यात पोटॅशियमचे प्रमाण हे जास्त असल्यामुळे शेतीसाठी उपयोगी असते. म्हणून ती शेतीसाठी देणार आहोत. त्याचप्रमाणे स्पेंटवॉशची जी राख बाहेर पडणार आहे, ती आपण शेतक-यांना खत म्हणून देणार आहोत |

५) **श्री बाळासाहेब लबडे, राहणार-पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक, तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणेः-**

| अनु.क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | कारखान्यातून बाहेर पडणा-या धुरामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होईल काय? | कारखान्यातून लोकांच्या आरोग्यावर परिणाम होणारा कोणताही धुर बाहेर पडणार नाही. बॉयलरसाठी जे इंधन वापरणार आहोत, तो आपल्या कारखान्यातील बगॅस आहे. स्पेंट वॉश आहे, तो मुळचा हानीकारक नाही. तो जाळल्याने त्यापासून होणारी राख ही शेतात वापरण्यात येईल. कारण त्यात पोटॅशचे प्रमाण जास्त असते. प्रकल्पातून जो धुर बाहेर पडतो, तो नियंत्रित करण्यासाठी आपण हवा प्रदूषण नियंत्रण उपकरणे कार्यान्वित करणार आहोत. इएसपी किंवा वेट स्क्रबर ही अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे ८५-९०% धुर हा नियंत्रित केला जातो. त्यामुळे अत्यंत अल्प प्रमाणात धुर बाहेर पडेल. त्याचा कुठलाच परिणाम लोकांच्या आरोग्यावर होणार नाही. |

६) **श्री संतोष वळसेपाटील, राहणार-निरगुडसर, तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणेः-**

| अनु.क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | प्रकल्पातील घन कच-याची कशी विल्हेवाट लावण्यात येईल? | प्रकल्पातून बॉयलरमधून राख बाहेर येते. हा मुख्य घन कचरा आहे. ती पोटॅशरिच असल्याने आपण शेतक-यांना खत म्हणून उपलब्ध करुन देण्यात येईल. |

७) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षणा संस्था, जिल्हा-नालगोंडा, राज्यः- तेलंगणा**

| अनु.क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी यांनी इंग्रजीत सांगितले की ते भारतातील सर्वात प्रथम असे पर्यावरणवादी आहेत की जो औद्योगिक विकासाचा आग्रह करत असतो. पर्यावरणवादी हे उद्योगांना विरोध करतात. पण मी नेहमी उद्योगविकासाचे समर्थन करतो. त्यांनी आसवणी विस्तारिकरणाबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की पर्यावरण संरक्षण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ते काही सूचना देऊ इच्छितातः-अ) पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाचे पाणी,हवा, जमिन यांचे आधारभूत सर्वेषण केलेले आहे. ते चांगले केलेले आहे. माझी विनंती आहे की कृपया प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील जनतेची आरोग्याची सद्यस्थिती, पीक उत्पादनाची सद्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची सद्यस्थिती याचा अहवाल तयार करण्याची सूचना केली. पर्यावरण समतोल अभ्यासासाठी त्याचा उपयोग होईल,<br>ब) त्यांनी प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा दिलेला असून त्यांनी लेखी सूचना उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ कार्यालयास ईमेलव्दारे परत सादर करणार असल्याची माहिती दिली,<br>क) त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सुरक्षितता व पर्यावरण संरक्षण करण्याची सूचना केली<br>ड) श्री रेड्डी यांना पर्यावरण सल्लागार यांचे योग्यप्रकारे पर्यावरण आघात मुल्याकंन अहवाल तयार केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.<br>इ) श्री रेड्डी यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीस प्रकल्पास बिनशर्त परवानगी प्रदान करण्याची शिफारस पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास करण्याची विनंती केली. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

यावेळी सदस्य,आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना ऑनलाईन उपस्थितांना आवाहन केली की त्यांच्या काही सूचना, आक्षेप किंवा टिका-टिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.

८) **श्री उज्जवला वाव्हळ, ग्रामपंचायत सदस्या,शिंगवे, तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणेः-**

| **अनु.क्रं** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १) | कारखान्यापासून आमचे गाव हे अडीच-तीन कि.मी. लांब आहे. माझा प्रश्न असा आहे की पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत? | कारखान्यातील पाण्याचे प्रदूषण मुख्यतः स्पेंट वॉश, स्पेंट लिझ आणि कन्डेन्सेट ह्या मुख्य घटकांमुळे होऊ शकते. त्यावर कारखान्यातच प्रक्रिया करणार आहोत. दुषित पाण्यावर प्रक्रिया करुन ते कॉन्सन्ट्रेट (concentrate) करण्यात येईल त्यामुळे त्याचे प्रमाण (quantity) कमी करुन ते इन्सिनरेशन बॉयलरमध्ये इंधन म्हणून जाळण्यात येणार आहे. स्पेंटलीझ आणि कन्डेन्सेट प्रदूषित घटक आहेत, त्यास आर.ओ. किंवा कन्डेनसेट पॉलिशिंग युनिट (सीपीयु) कार्यान्वित करणार असून त्यात प्रक्रिया केलेल्या पाण्याचा प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारे कारखान्यातून दुषित पाणी प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. |

बैठकीचा समारोप करताना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण दुपारी १२ वाजल्यापासून बैठकीस सुरवात केलेली आहे. सादरीकरणानंतर बऱ्याच ऑनलाईन उपस्थित असलेल्यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना केलेल्या आहेत. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. अजूनही कोणासही सूचना, आक्षेप नोंदवावयाचे असल्यास त्या नोंदवाव्यात. उपस्थितांना आवाहन करण्यात आले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नाही. त्यावेळी अध्यक्षा यांनी सांगितले की कदाचित उपस्थितांपैकी कोणाला ऑनलाईन सूचना करताना अडथळा आला असेल वा इतर कोणाला सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास त्यांना स्थानिक म.प्र.नि.मंडळाच्या ईमेल वर पाठवाव्यात. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप ग्राह्य धरण्यात येऊन शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील. त्यांनी सदस्य यांना मेल आयडी तोंडी सांगण्याची सूचना केली. अध्यक्षा यांनी सूचना करण्यासाठी थोडा अवधी दिला व प्रतिसाद नसल्यास बैठक संपन्न् करण्याच्या सूचना दिल्या.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करताना सांगितले की वृत्तपत्रात जाहिर सूचना देताना व त्याचप्रमाणे ग्रामपंचायत व इतर अधिसूचित शासकीय कार्यालयात दस्तावेज उपलब्ध करताना पत्रात ईमेलआयडी देण्यात आलेला आहे. गुगलवर जरी एमपीसीबी टाकले, तरी त्यावर वेबसाईटचा पत्ता उपलब्ध होऊ शकतो. तरीही त्यांनी ईमेलआयडी उपस्थितांच्या माहितीसाठी तोंडी सांगितला.

१) sropune2@mpcb.gov.in;

२) ropune@mpcb.gov.in

त्यांनी सांगितले की वरिल ईमेलआयडीवर आपण आपल्या सूचना, आक्षेप नोंदवू शकता.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की बराच काळ थांबून आवाहन करण्यात आले. उपस्थितांकडून प्रतिसाद नसल्याने प्रश्न संपल्याचे गृहित धरुन त्यांना माननीय अध्यक्षा, शासकीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील ऑनलाईन यंत्रणा हाताळणी करणारे अधिकारी व कर्मचारी, प्रकल्प अधिकारी, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत संस्था ऑनलाईन उपस्थितांचे, बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले आणि माननीय अध्यक्षा यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**(नितीन शिंदे),**
सदस्य, समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप- प्रादेशिक अधिकारी, पुणे - २ ,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे

**(डॉ. जयश्री कटारे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी – पुणे,
जिल्हा-पुणे